# मराठी समाजभाषा

**डॉ. समाधान इंगळे**
*सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग,*
*र. भ. अट्टल महाविद्यालय, गेवराई जि. बीड*

समाज बोलतो त्या भाषेला 'बोलीभाषा' असे संबोधले जाते, परंतु 'प्रमाणभाषा' हेसुद्धा त्याच समाजाचे एक व्यापक स्तरावरील विनिमयाचे साधन आहे. भाषा ही समाजाचे अभिन्न अंग आहे. अनेक भाषा शास्त्रज्ञांनी भाषेला 'सामाजिक संस्था' असे संबोधलेले आहे. 'समाजाची भाषा' आणि 'भाषिक समाज' ही परस्पर ओळख म्हणजे नाण्याच्या दोन बाजूंसारखी आहे. 'मराठी समाज', 'बंगाली समाज', 'हिंदी समाज', 'बिहारी समाज', 'गुजराती समाज', 'राजस्थानी समाज' अशी भाषेच्या अनुषंगाने समाजाची ओळख बनत असते. समाजाची हीच ओळख एक संस्थात्मक पातळीवर तयार होते.

राज्यांच्या बाहेर किंवा देशाच्या बाहेर भाषिक अंगाने नातेसंबंध सांगणारा समाज बनत असतो. अमेरिकेत, आखाती राष्ट्रात किंवा युरोपात 'मराठी भाषिक' म्हणून लोक एकत्र येत असतात. त्यामुळे भाषा ही समाजाची ओळख बनते. भाषा ही एक ढोबळ ओळख असली तरी, भाषेतही अनेक पदर दडलेले असतात. दर बारा कोसांवर भाषा बदलते असे भाषेच्या प्रादेशिक वैविध्याच्या अंगाने बोलता येते. खरेतर प्रत्येक गावात भाषेला एका वेगळ्या पद्धतीने वापरले जाते. एका गावात 'गोडघाशा' हा शब्दप्रयोग 'गोड बोलून फसवणारा' असा घेतला जातो, तर त्याच पंचक्रोशीतील दुसऱ्या गावात 'गोडघाशा' या शब्दाचा 'अर्थ गोड पदार्थ आवडणारा' किंवा 'गोड पदार्थांवर ताव मारणारा' असा घेतला जातो.

भाषा कुळाचा सिद्धांत आणि त्यातील उपभाषा. त्या सर्व उपभाषांच्या प्रमाणभाषा, आणि त्या प्रत्येक प्रमाण भाषेतील बोलीभाषा ज्या दर बारा कोसांवर बदलत असतात. यातही एखाद्या गावातील एखाद्या कुटुंबात नांदावयास आलेली सून तिच्या माहेरची बोली आणि संस्कृती घेऊन आलेली असते. नकळत तिच्या भाषेचा प्रभाव त्या कुटुंबातील सदस्यांवर पडत असतो. तिच्याही स्वतःच्या भाषेवर कुटुंबाच्या भाषेचा प्रभाव पडत असतो. त्यामुळे आदान - प्रदान हे भाषेचे व्यवच्छेदक लक्षण आहे. या आदान - प्रदानातून भाषा सातत्याने बदलत असते. विकसित होत असते किंवा एखादी भाषा मृत्यही होत असते.

भाषेच्या गरजेतून भाषेचे महत्व सिद्ध झालेले आहे. काळाच्या प्रवाहात समाजाच्या विकासाबरोबर भाषाही सातत्याने प्रवाहित होत आलेली आहे, बदलत आलेली आहे, तद्वतच विकसित होत आलेली आहे. भाषेचा प्रवाह अधिक सुलभ आणि सुकर व्यवहार करण्याकडे असतो. त्या अनुषंगाने काही प्रमाणात संस्कृत भाषा वगळता सर्व भाषा या परिवर्तनशील राहिलेल्या आहेत. त्यामुळे 'भाषा मरते' हे विधान खोटे ठरून 'भाषा बदलते' असे विधान अधिक खरे वाटते.

भाषेचे भाषावार प्रांतरचनेच्या माध्यमातून जसे प्रादेशिक स्तरावरील वादविवाद आढळतात, तसेच भाषेचे राजकीय महत्त्वही सातत्याने प्रकट होत असते. वर्णव्यवस्थेतील विविध जाती घटकांचे त्या समाज घटकाच्या कामाच्या स्तरावरून, शिक्षणाच्या स्तरावरून आणि सांस्कृतिक स्तरावरून वेगळेपण ठरत असते. भाषा समाजाच्या बहुअंगी विकासात सर्वाधिक योगदान देत असते. तर समाजाच्या या भौतिक, भावनिक, मानसिक, सांस्कृतिक गरजातून भाषेलाही गतिमान होताना विकसित होता येत असते.

जागतिकीकरणाच्या प्रभावामुळे भाषेला एक प्रकारे 'सपाटीकरण' येऊ घातले आहे अशा प्रकारची भीती व्यक्त होत असते. मात्र नवशिक्षित समाज हा भाषेला अधिक व्यावसायिक उपयोगितेच्या माध्यमातून बदलवून घेत असतो. या तुलनेत निरक्षर समाज हा मूळ भाषेला आपल्या व्यवहारातून जपत असतो.

जागतिकीकरणाच्या रेट्याने जगातील सर्वच भाषांवर वापराच्या दृष्टीने प्रभाव पडतो. या प्रभावातून या भाषा स्वतःच्या उदरात दैनंदिन कामकाजातून हजारो शब्द, संकल्पना स्वीकारत असतात.

दैनंदिन व्यवहारात भाषेचा वापर वर्तमानात प्रचंड वाढलेला आहे. लेखनाच्या माध्यमातून, बोलण्याच्या माध्यमातून, समाज माध्यमांवरील मुद्रणाच्या (टायपिंग) माध्यमातून किंवा व्हाईस टायपिंग सारख्या अद्यावत लिखाणातून,

मोबाईलवर होणाऱ्या अहोरात्र संवादातून भाषा प्रचंड प्रमाणात वापरली जाते. भाषेचा वापर एवढ्या बहुस्तरीय पद्धतीने होताना शुद्ध - अशुद्धतेच्या मर्यादा भाषेने कँव्हाच उल्लंघलेल्या आहे. भाषेने स्वतःचे महत्त्व या निमित्ताने सिद्ध केले आहे. गुगलने इनपुटच्या माध्यमातून सर्वांना हाताळता येईल अशी अतिशय सोपी कळसुत्री प्रत्येक मोबाईल डिव्हाईस, संगणक, टॅब, आयफोन, इंटरॅक्टिव्ह पॅनल यामध्ये दिलेली आहे. अशा प्रकारच्या सोयी उपलब्ध झाल्यामुळे भाषेची टंक लेखनाची मक्तेदारी कमी होऊन प्रत्येक वापरकर्त्याला हे ज्ञान आता प्राप्त झाले आहे.

मातृभाषा शिक्षणाचे माध्यम असावे हे आता सर्व मान्य झालेले आहे. महाराष्ट्र राज्यात शालेय स्तरावर मराठी ही राज्यभाषा म्हणून अनिवार्य करण्यात आलेली आहे. या सर्व गोष्टींचा सांगोपांग विचार करता, मराठी भाषा आणि मराठी समाज हे एक समीकरण निर्माण झाले पाहिजे. नवीन ज्ञान शाखांच्या आवश्यकतेनुसार त्या त्या विषयांच्या अनुषंगाने पारिभाषिक शब्द, संज्ञा, समानार्थी शब्द, विरुद्धार्थी शब्द यांची मराठी भाषेत निकड भासत आहे. अशा पारिभाषिक शब्दांचे खंड प्रत्येक विषयानुरूप उपलब्ध आहेत, मात्र काळाचा रेटा बघता विज्ञान, तंत्रज्ञान आणि माहिती यासाठी अजूनही पारिभाषिक शब्दांची निर्मिती भाषा तज्ज्ञांना करावी लागणार आहे. समाजाच्या ज्ञानात्मक पातळीवरील कुठल्याही गरजा मराठी भाषा पुरवू शकेल एवढा शब्द समुद्र निर्माण करणे आवश्यक आहे.

कुठल्याही प्रगत समाजाचे लक्षण म्हणजे त्या समाजाची प्रगल्भ, प्रगत, बहुप्रवाही भाषा असते. आणि तेच ध्येय बाळगून मराठी भाषेला आव्हान स्वीकारावे लागेल. त्यासाठी मराठी भाषिक म्हणून आपण कुठलाही विषय, कुठलीही ज्ञान शाखा आणि कुठलेही क्षेत्र निवडले तरी आपल्याच भाषेतून ते हाताळण्याचे आपण मनावर घेतले पाहिजे त्यासाठी प्रयत्न केले पाहिजे.

**संदर्भ ग्रंथ**

1. भाषा व साहित्यः संशोधन खंड पहिला - संपादक- डॉ. वसंत स. जोशी
2. भाषावार प्रांतरचना आणि मराठीः काही परिप्रेक्ष्यः संपादक - रमेश वरखेडे
3. मराठी बोली (रूप आणि बोल)- डॉ. विद्या पाटील/ डॉ. निशिगंधा व्यवहारे
4. मराठी शुद्धलेखन प्रदीप - मो. रा. वाळंबे